# चोरीतील मोबाइल विक्रीस आले अन् जाळ्यात अडकले

लोकमत दि 19/06/2023

## चोरट्यांकडून पावणेतीन लाखांचे वीस मोबाइल पोलिसांनी केले जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** शहरात रस्त्याने पायी जात असलेल्या नागरिकांच्या हातातील मोबाइल हिसकावून पळ काढण्याच्या घटनांमध्ये गेल्या काही दिवसांत वाढ झाली होती. अशाच चोरीतील मोबाइल विक्री करण्यासाठी आलेल्या दोघा जणांना पोलिसांनी पकडून त्यांच्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. या टोळीत दोन अल्पवयीन मुलांचाही समावेश आहे. त्यांच्याकडून दोन लाख ७३ हजार रुपये किमतीचे २० मोबाइल जप्त करण्यात आले आहेत.

शहरात दुचाकीवरून येत मोबाइल हिसकावून पळ काढण्याच्या घटना दररोज घडत आहेत. त्या पार्श्वभूमीवर पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी पोनि. द्वारकादास चिखलीकर यांना आरोपींच्या शोधाचे आदेश दिले होते. एलसीबीचे सपोनि पांडुरंग माने यांचे पथक या चोरट्यांच्या मागावर होते. त्यात मोर चौक परिसरात दोन तरुण जुने मोबाइल विक्री करण्यासाठी आल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पथकाने लगेच त्या ठिकाणी धाव घेत कमलेश सुरेश वाघमारे (रा. वाडी रोड, एकतानगर) आणि कपील अशोक कदम (रा. एकतानगर) या दोघांना पकडले. त्यांच्या टोळीत दोन अल्पवयीन मुलांचाही समावेश होता.

आरोपींकडून चोरीतील २० मोबाइल जप्त करण्यात आले. यातील चार मोबाइलचे मालक मिळाले आहेत. तर उर्वरित १६ मोबाइल कोणाचे आहेत, हे स्पष्ट झाले नाही.



### मित्राची दुचाकी चोरीसाठी वापरली

आरोपींनी मोबाइल हिसकाविण्यासाठी मित्राची दुचाकी आणि स्कुटी वापरली होती. पहाटे आणि सायंकाळच्या वेळी फिरायला बाहेर पडलेल्या नागरिकांना ही टोळी टार्गेट करीत होती. त्यासाठी अल्पवयीन मुलांनाही या चोरट्यांनी आपल्या टोळीत सहभागी करुन घेतले होते. त्यांच्याकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

लोकमत दि 19/06/2023

# लुटमार करणारे पंजाबचे चार अटकेत

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** पंजाब येथून नांदेडात लुटमार करण्यासाठी आलेल्या चार जणांना वजिराबाद पोलिसांनी पाठलाग करून पकडले. या चार जणांनी हिंगोली गेट ओव्हरब्रीजखाली एका तरुणाला खंजरचा धाक दाखवून लुबाडले होते. त्यांच्याकडून खंजर आणि मोबाइल जप्त करण्यात आला आहे.



राहुल साहेबराव मेटकर रा.चिखलवाडी हे १७ जून रोजी हिंगोली गेट ओव्हरब्रीज खालून पायी घराकडे जात होते. यावेळी दुचाकीवरून आलेल्या चार जणांनी त्यांना अडवून खंजरचा धाक दाखवित लुबाडले. याबाबत वजिराबाद पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलिस उपाधीक्षक सुरज गुरव, पोनि.जगदिश भंडरवार यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि.राम केंद्रे, मनोज परदेशी, भाऊसाहेब राठोड, बालाजी कदम, शेख इम्रान शेख एजाज, प्रभाकर कांबळे, शेख जाफर यांनी तातडीने घटनास्थळाकडे धाव घेतली. यावेळी पोलिसांना पाहून आरोपी पळ काढण्याच्या तयारीत होते. तोच पोलिसांनी त्यांच्या मुसक्या आवळल्या. गुरुप्रीतसिंघ धर्मसिंह मजबीशीख, जगजितसिंघ सतनामसिंघ मजबीशीख, करणदीपसिंघ बलकारसिंघ मजबीशीख आणि मलकीतसिंघ लखविंदरसिंघ मजबीशीख अशी या आरोपींची नावे आहेत. हे सर्व आरोपी पंजाब राज्यातील आहेत. त्यांच्या विरोधात वजिराबाद पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.